MAH/MUL/03051/2012

# Vidyawarta®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Special Issue, August 2022




**Guest Editor**

Dr. M.N.Kolpuke

Dr.D.S.Choudhari

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Lale Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

**Special Issue August 2022**

**Date of Publication 13 August 2022**

**Guest Editors**

**Dr. M. N. Kolpuke,**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur

**Dr. D. S. Choudhari,**
Coordinator,
Internal Quality Assurance Cell,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur.

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

42) नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणा समोरील आव्हाने
प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे, जि.परभणी ||162

43) नवीन शैक्षणिक धोरण आणि स्त्री शिक्षणासमोरील आव्हानांचा अभ्यास
डॉ. रजनी अ. बोरोळे, जि. लातूर ||166

44) उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कल
कौशल्या चांगुजी खिल्लारे, औरंगाबाद ||170

45) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० — एक दृष्टिक्षेप
डॉ. आनंद मुसळे, जि.लातूर ||173

46) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० समोरील आव्हाने व संधी
प्रा.डॉ. धालगडे अरुण बळीराम, जिल्हा लातूर ||178

47) भारतीय उच्च शिक्षणातील वास्तव व समस्या
प्रा.डॉ. व्ही. पी. सांडूर, जि. लातूर ||181

48) नवीन शैक्षणिक धोरण :एक सैद्धांतिक मूल्यमापन
डॉ. प्रा. प्रमोद जी. शिंदे, लातूर ||186

49) नवीन शैक्षणिक धोरण आणि संशोधनातील संधी
डॉ. शिवराज पाटील, शिरूर ताजबंद ||189

50) नवीन शैक्षणिक धोरणाचे टप्पे : एक अध्ययन
डॉ. एस. पी. घायाळ, शिरूर ताजबंद ||192

51) शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यातील समस्या व उपाययोजना
बदनाळे शिवरूद्र शरणप्पा, अंकुर तानाजीराव पाटील ||196

52) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२० : अमंलबजावणीतील पूर्व अटी
डॉ. हरनावळे सी. के., नांदेड ||199

53) उच्च शिक्षणातील विचार प्रवाह : दिशा व दृष्टी
प्रा.डॉ. शंकरानंद येडले, लातूर ||204

54) नविन शैक्षणिक धोरण २०२०
प्रा.डॉ.बी.आर.शिंदे, जि.परभणी ||212

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | Special Issue August 2022 | 0162

42

# नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणा समोरील आव्हाने

**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक व वाणिज्य विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी

************

**प्रस्तावना (Introduction) :**

मानवाच्या भौतिक, आध्यात्मिक आणि व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षणास फार महत्व आहे. आधनिक काळात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी शिक्षण — शिवाय पर्याय नाही. शिक्षण घेण्याचे वय उलटून गेले तरी आता शिक्षणच्या सुविधा निर्माण झालेल्या आहेत. शिक्षणसेवा ही मूलभूत सेवा मानली गेल्यामूळे शिक्षणाच्या बाबतीत शासनाचा सहभाग जास्त प्रकारात असतो. याशिवाय शिक्षणप्रेमी संस्थांकडून शाळा, महाविद्यालये चालविली जातात. कांही संस्थांना शासनाकडून अनुदान मिळत तर कांही शाळा, महाविद्यालये शासनाकडून अनुदाने न घेता विनाअनुदान तत्वावर चालविली जातात.

१९६८ मध्ये देशाच्या प्रंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाहिले राष्ट्रीय शैक्षिणिक धोरण (NPE) जाहिर केले. भारतात शिक्षणाचा प्रचार आणि नियमन करण्यासाठी भारत सरकारने तयार केलेले धोरण आहे. या धोरणात ग्रामीण आणि शहरी भागातील प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणाचा समावेश आहे. त्यानंतर १९८६ व २०२० ला शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आली आहे.

**संशोधनाचे उद्देश :—**

सदर शोध निबंधासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आली आहेत

१) शिक्षणाचा इतिहास शोधणे

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणचा अभ्यास करणे

३) शिक्षणातील बदलत्या प्रवाहाचा अभ्यास करणे

४) भारतीय शिक्षणासमोरील आव्हाने शोधणे

५) निष्कर्ष काढणे

**संशोधनाची गृहितके :—**

संशोधनाची गृहितके खालील प्रमाणे ठरविण्यात आली.

१) प्राचीन काळापासून शिक्षणाचा प्रसार केला जात आहे.

२) शिक्षणासमोर अनेक आव्हाने उभी आहेत.

**अभ्यास पध्दती :—**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम सामग्रीचा आधार घेतला असून यामध्ये योजना, दैनिक वर्तमान लेख, संदर्भ ग्रंथ इत्यादीचा आधार घेतलेला आहे.

**शिक्षणाचा इतिहास :—**

भारतीय संस्कृती जशी प्राचीन आहे तशीच आपली शिक्षण प्रणाली सुध्दा प्राचीन कालखंडापासून प्रचलित आहे. या कालखंडात गुरूकूल शिक्षण पध्दती होती. इ.स.पूर्व १२०० च्या कालखंडात म्हणतात. या काळात शिक्षणाची ध्येय अत्यंत व्यापक होती. अज्ञानाच्या अंधारापातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाने हे शिक्षनाचे ध्येय होते. विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा मानसिक व शारीरिक विकास साधणे हे शिक्षणाचे ध्येय मानले जात होते. गुरू हा ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, निपक्षपाती असावा अशी अपेक्षा होती. शिष्यांची ओळख ही त्याच्या गुरूवरून होत असे.

**उत्तर वैदिक काहातील शिक्षण :—**

या काळात धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनात मोठे बदल घडून आले. यज्ञ, धार्मिक विधीचे महत्व वाढून वर्णव्यवस्था ठार झाली. स्त्रियांचे स्थान व दर्जा घसरला. शिक्षण पध्दतीतही महत्वाचे बदल घडून आले. या काळात शुद्रांना शिक्षनाचा अधिकार नाकारण्यात आला. आश्रम पध्दती अस्तित्वात आली. आश्रमातील विद्यार्थी आपल्या वर्णाला अनुसरून शिक्षण घेत. राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत परंतु सामान्य घरातील स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहत असत.

**बौध्दकालीन शिक्षण प्रणाली :—**

हा कालखंड गौतम बुध्दांच्या बौध्द धर्माच्या स्थापने पासून ते सम्राट हर्षवर्धनाच्या राजवटी पर्यंत मानला जातो. हा कालखंड प्राचीन भारतीय शिक्षणात महत्वाचा मानला जातो. उच्च शिक्षणासाठी या कालखंडात तक्षशिला, नांलदा, विक्रमशिला इत्यादी मोठमोठी विदयापीठे स्थापन झाली. या विदयापीठात प्रवेश मिळवण्यासाठी विदयार्थ्यांना व्दार परीक्षा नावाची अत्यंत कठीण परिक्षा दयावी लागत.बौध्द विदयापीठांतून बौध्द धर्माची शिकवण, तत्वज्ञान, भाषाशास्त्र, शिलकला, संगीत, खगोलशास्त्र, व्याकरण तसेच इतर धर्माची शिकवण इत्यादी विषय शिकविले जात असत. या विदयापीठात देश विदेशातून विदयार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत.

**मध्ययुगीन कालखंड :—**

इ.स. १२०० ते इंग्रज भारतात येण्यापूर्वीचा मध्ययुगीन कालखंड मानला जातो. या कालखंडात मंत्र—तंत्र व जादूटोणा यांचे प्रस्थ वाढले अनिष्ठ चालीरिती, प्रथा, परंपरा व कट्टर धार्मिक विधी, होम वहन यांचे प्रमाण वाढले. स्त्रियांवरचे बंधने जास्तीची वाढली त्यांची शिक्षणाची दारे बंद झाली. याच काळात महाराष्ट्रात विविध थोर संत होऊन गेले. त्यांनी आज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी सर्व सामान्य जनतेला वारकरी सांप्रदायाच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे कार्य केले. त्यांच्यात एकजूट निर्माण झाली आणि त्यांना प्रथा परंपरांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले.

**ब्रिटीश कालीन शिक्षण प्रणाली :—**

सतराव्या शतकानंतर पोर्तुगीज, डच, फ्रेंच राज संतांनी भारतात प्रवेश केला. या राजसंतांनी भारतात प्राथमिक शिक्षणाला सुरूवात केली. त्यानंतर इंग्रज भारतात आले. त्यांनी व्यापार करून पूर्ण भारत देश स्वतःच्या आंमलाखाली आणला. त्यांनी भारतीयांना पाश्चिमात्य धरतीचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. त्यांचे शिक्षण सर्वांसाठी खुले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार होण्यास मदत झाली. पाश्चिमात्य शिक्षणातून स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची ओळख भारतीयांना झाली. धार्मिक शिक्षण मागे पडून धर्म निरपेक्ष शिक्षणाचा विकास इंग्रजांनी त्यांना कारकुनी कामात मदत होईल अशा कारकुन निर्माण करणाऱ्या शिक्षणावर भर दिला.

**स्वातंत्र्योतर कालखंडातील शिक्षण :—**

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर साक्षरतेची गरज सर्वानाच प्रकर्षाने जाणवली. भारताच्या राज्यघटनेत ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद केली. योजना आयोगाने आपल्या पंचवार्षिक योजनामध्ये शिक्षणाला अग्रक्रम दिला. भारतीय उच्च शिक्षणाच्या सुधारणेसाठी १९४८रोजी राधाकृष्ण आयोग नेमला. त्यानंतर १९६४ ला डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली देशातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणातील दर्जा सुधारणेसाठी कोठारी आयोग नेमला.

**राष्ट्रीय शैक्षणिक धारण (National Education policy १९६८)**

कोठारी आयोगाच्या शिफारशीवर आधारित भारत सरकारने आपले पहिले शैक्षणिक धोरण १९६८ मध्ये प्रसिध्द केले.भारत सरकारने ग्रामीण आणि शहरी दोन्ही भारतातील निरक्षरतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध कार्यक्रम प्रायोजित केले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दूल आझाद यांनी एकसमान शैक्षणिक प्रणालीसह संपूर्ण देशभरातील शिक्षणावर केंद्र सरकारच्या मजबूत नियंत्रणाची कल्पना केली. केंद्र सरकारने भारताच्या शिक्षण प्रणालीचे आधूनिकीकरण करण्यासाठी प्रस्ताव विकसित करण्यासाठी विदयापीठ शिक्षण आयोग (१९४८—१९४९), माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२—१९५३), विदयापीठ अनुदान आयोग आणि कोठारी आयोग (१९६४—६६) ची स्थापना केली. १९६१ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक आणि प्रशिक्षण परिषाद (एनसीईआरटी) ची स्थापना एक स्वायत संस्था म्हणून केली. ही संस्था केंद्र आणि राज्य सरकारांना शैक्षणिक धोरने तयार करण्यासाठी आणि आंमलबजावणी साठी सल्ला देईल. या राष्ट्रीय शिक्षण धोरणात मोफत आणि सक्तीचे शिक्षण, शिक्षकांचे शिक्षण, भाषा विकास, सर्वांना शिक्षणाची संधी, एकसमान शैक्षणिक संरचना, प्रगतीचा आढावा, शैक्षणिक खर्चात राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के वाढ समाविष्ठ केली इत्यादी वैशिष्ट्ये होती. परंतु या धोरणाच्या कामगिरीत कृती योग्य कार्यक्रम आणला गेला नाही. निधीची

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



कमतरता, शिक्षण हे राज्याच्या यादीत असल्यामूळे केंद्राची भूमिका फारशी नव्हती, १०+२+३ शिक्षण पध्दतीचा समावेश इत्यादी मूळे फारशे यशस्वी झाले नाही. त्यामुळे राजीव गांधी यांनी पूर्वीच्या शैक्षणिक धोरणात बदल करून १९८६ मध्ये देशातील संस्थासाठी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ (National Education Policy, १९८६):—**

१९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राजीव गांधी पंतप्रधान असताना अमलात आले. या धोरणाचा मुख्य उद्देश महिला, अनुसूचित जाती आणि अनूसूचित जमातीसह सर्वांना समान शिक्षणाची संधी प्रदान करणे हा होता. त्यामुळे या धोरणात असमानता दूर करण्यावर आणि शिक्षणाच्या संधी समान करण्यावर विशेष भर असे नाव देण्यात आले.

या धोरणातील महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

१) शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध् करून देणे
२) शिक्षण हे समता प्रस्थापित करण्यासाठी देणे
३) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची पुर्नरचना करणे
४) शिक्षकांच्या प्रशिक्षणात आधुनिकता आनने
५) शिक्षणात गुंतवणूक राष्ट्रीय उत्पान्नाच्या १०% करणे
६) प्रशिक्षण आणि निरंतर शिक्षणावर भर देणे
७) शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय साधन संपत्तीचा योग्य विकास व वापर करणे
८) समाजाभिमुख शिक्षण पध्दती बनविणे
९) तांत्रिक व व्यावसायकि शिक्षणाची पुनर्रचना करणे
१०) बाल संगोपन व शिक्षण यांचा समन्वय साधणे, मुक्त विद्यापीठे, दूरशिक्षण विभाग,ग्रामीण विद्यापीठे आणि बुध्दीमान विद्यार्थ्यासाठी नवोदय विद्यालये स्थापन करणे
११) अभ्यासक्रमात स्वातंत्र्यलढा, संविधानिक जबाबदाऱ्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्त्री पुरूष समानता, पर्यावरन संरक्षण, सामाजिक समस्यांचे निर्मूलन इत्यादीचा समावेश करणे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२०**

२०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी २०१६ मध्ये माजी केंद्रीय सचिव टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय धोरण समिती नेमाली. या समितीने डी पी ई पी सर्व शिक्षा अभियान, राइट टू एज्युकेशन, एनपीईजीईएल, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, आय ई डी एसएस, प्रौढ साक्षर भारत, इत्यादी शासकीय योजनांचा आढावा घेतला.

राष्ट्रीय शैक्षणिक धारेण २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे आहे. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृध्द परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले. शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणा केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व पातळ्यांवर आपल्या समाजातील सर्वात आदरनीय आणि आवश्यक सदस्य म्हणून पुर्नस्थापित करण्यासाठी मदत करणे अत्यावश्यक आहे. शिक्षक हा पुढील आकार देतो. सध्याच्या १०+२ ऐवजी ५+ ३ +३ +४ असा नवीन आकृतीबंध लागू होणार आहे. सर्वांना शिक्षक मिळावे यासाठी सरकारने अंगणवाड्या, बालवाड्या, प्राथमिक व माध्यमिक् शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, रात्रशाळा, रात्रमहाविद्यालये, तंत्रशाळा, औद्योगिक व व्यवसायीक शिक्षणाचा केंद्रे, साक्षरता प्रसारासाठी प्रशिक्षण केंद्रे या सव्र संस्थांचे देशभर जाळे उभारले. प्राचिन काळापासून आजपर्यत ज्ञान संपादन चारित्र्यनिर्मिती, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय भावन व राष्ट्रप्रेम निर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना हिच शिक्षणाची महत्वाची उद्दिष्टे राहिली आहेत. परीक्षेतील गुणांना शैक्षणिक गुणवता मानले जात आहेत. जागतिकीकरणामुळे सरकारणे शिक्षणावरील अनुदान कमी करून खाजगिकरणावर भर दिल्यामुळे शिक्षण महाग झाले आहे. या सर्व वातावरणात सर्वसामान्य विद्यार्थी उच्च शिक्षण पासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**शिक्षणातील बदलते प्रवाह**

शिक्षण हे सर्वच पातळ्यावर, विविध स्तरावर, विविध क्षेत्रातून बदलत चालले आहे. रेडिओ, टि.व्ही, कॉम्पुटर, मोबाईल इत्यादी दूरसंचार क्षेत्रात खूप मोठी क्रांती घडून आलेली आहे. या साधनांचा शिक्षणातही मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. जागतिकीकरणात आपल्याला टिकून राहायचे असल्यास शिक्षणाची उद्दिष्टे

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | Special Issue August 2022 | 0165

ठरवावी लागतील ती खालील प्रमाणे आहेत.

१) शिक्षणाचे ज्ञानप्राप्ती हे अंतिम उद्दिष्ट असावे करिअर हे ध्येय नसावे.

२) चारित्र्यसंपन्न नागरिक घडविले, शिक्षणाप्रति जागृत विदयार्थी घडवणे.

३) शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न व्हायला पाहिजे.

४) शिक्षण हे प्रायोगिक झाले पाहिजे चार भिंतींच्या बाहेर पडले पाहिजे.

५) विदयार्थ्यांत शिक्षण प्राप्ती ओढ निर्माण केली पाहिजे.

६) शिक्षक हे विदयार्थी प्रिय घडवले पाहिजे.

७) शिक्षण हे कौशल्याधारीत झाले पाहिजे.

८) विदयार्थ्यांना अपेक्षांच्या ओझ्यातून बाहेर काढले पाहिजे. विदयार्थी गुण मिळविणारे मशीन असून समाजाकडून अपेक्षा आहेत.

९) विदयार्थ्यात दिवसेंदिवस असुरक्षततेची वाढत चाललेली भावना कमी करून त्यांना विश्वासात घेणारे शिक्षण विदयार्थ्याच्या जगण्यासाठी उपयोगी असे कौशल्य आधारीत शिक्षण दयावेत.

१०) शिक्षणातून पाठांतर, घोकंपट्टी, कॉपी इत्यादी गोष्टी शिक्षणातून हद्दपार झाल्या पाहिजेत.

११) मातृभाषेतून शिक्षण हा विदयार्थ्याचा मुलभूत अधिकार आहे याची जागृती पालक आणि समाजात निर्माण केली पाहिजे.

१२) विदयार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून शिक्षणात सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास झाला पाहिजे.

१३) मुलांची नैसर्गिक कुवत व आवड लक्षात घेवूनच त्यांना शिक्षण दिले पाहिजे.

१४) शिक्षक स्वातंत्र्य ही संकल्पना आज समाजात रूजविण्यात यावी. पालकांच्या अपेक्षांचे दडपण कमी झाले पाहिजे.

१५) एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलू शकणारे शिक्षण निर्माण केले पाहिजे.

१६) कारकुन बनवणारे शिक्षण स्वातंत्र्यानंतरही चालू आहे ते थांबविण्यात यावे.

१७) विविध स्पर्धा परीक्षांच्या नावाखाली बारा तास चालणारे शिक्षण थांबविले पाहिजे.

**भारतीय शिक्षण समोरील आव्हाने:—**

प्राचीन काळी शिक्षणाप्रतीची तळमळ विदयार्थी आणि शिक्षण दोन्ही ठिकाणी पाहायला मिळत नाही. जागतिकीकरणाच्या रेटयात प्रत्येकाच्या रहाणीमाणात सुधारणा झाली. नवनवीन तंत्रज्ञान माणसाला अवगत झाले. मोठया प्रमाणात माहितीचा ओघ माणसाच्या हातात येऊन थांबला. मोबाईल मध्ये झालेल्या क्रांतीने जग पूर्णत: बदलून गेले. सोशल मिडीयाचा वापर मोठया प्रमाणात होताना दिसत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या महापुरात आजची तरूण पिढी वाहत चालली आहे. शिक्षणातील बदलत्या प्रवाहांचा विचार करत असताना विदयार्थ्यांनी बदलत्या इंडस्ट्रीजचा विचार करणे गरजेचे आहे. करिअर निवडताना बेसावध राहून चालणार नाही. स्पर्धेच्या युगात शाळा, कॉलेजमधील ज्ञानावर अवलंबून राहता येणार नाही. त्यांना डोळसपणे सगळ्या गोष्टी स्वत: शिकाव्या लागणार आहेत. बदलत्या काळात फक्त पारंपारीक शिक्षण हे विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्यासाठी उपयोगी पडणार नाही. त्यामुळेच कौशल्यावर आधारीत शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. वाढणाऱ्या बेरोजगारीचा दर कमी करायचा असेल तर अभ्यासक्रमा बरोबरच विदयार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्य आत्मसात केली तर त्यांना त्याचा निश्चितच फायदा होतो. कौशल्य आणि ज्ञान हे देशाच्याआर्थिक वाढीचा आणि सामाजिक विकासाची प्रेरक शक्ती आहेत. स्पर्धेच्या युगात फक्त वैदयकीय आणि इंजिनिअरींग क्षेत्राकडे न वळता बाकीच्या क्षेत्राकडे वळावे. या क्षेत्रातून विदयार्थ्याच्या कलागुणा बरोबरच नवनिर्मितीला ही खूपच वाव आहे.

**निष्कर्ष:—**

आजची तरूणाई मोबाईल सोशल मिडीयावर आपला स्टेटस सतत बदल असते.भारतीय समाजात शिक्षणाचे बाजारीकरण होतान दिसत आहे. मोठी आव्हाने पेलण्याची ताकद शिक्षणात निर्माण करणे गरजेचे आहे. कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होऊ घातले आहेत. त्यामूळे शिक्षण क्षेत्राला नव्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची:—**

०१. मनिषा सावेकर: दूर शिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

०२. डॉ.व्ही.बी.गायकवाड: भारतीय उच्च शिक्षणासमोरील अव्हाने महाराष्ट्र टाईम्स दि.११ मे, २०१७

०३. हर्षवर्धन कडेपूरकर: शिक्षण क्षेत्रासमोरीज आव्हानांना सामोरे कसे जातात येईल दि. १७ जुलै, २०२०



Late Ramesh Warpudkar (ACS) College Dist. Parbhani
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani